'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 258 (B)
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
January 2021

Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

## PEER REFREED & INDEXED JOURNAL

January 2021

Special Issue 258 (B)

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

TRUE COPY

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source) : Internet - Kisan Aandolan Delhi against Farmer Bill 2020

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 258 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
January 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 33 | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थांच्या प्रादेशिक भिन्नतेचे आणि आर्थिक कामगिरीचे मूल्यांकन : अल्प मुदतीच्या सहकारी पत संरचनेचा विशेष संदर्भ | पी. ए. दीक्षित, प्रा. डॉ. ए. आर. मुंगी, प्रा. डॉ. ए. वाय. दीक्षित | 166 |
| 34 | दीपनगर औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती | डॉ.विनोद मोरे | 176 |
| 35 | अल्पभूधारक शेतकरी आणि भारतीय शेती | श्यामराव वासनीकर, डॉ. विजय भोपाळे | 185 |
| 36 | कामगार चळवळ - एक संघटन : काळाची गरज | डॉ.चांगदेव मुंढे | 190 |
| 37 | ग्रामीण वृध्दमहिलांच्या समस्या व शासकीय उपाययोजना : एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ.संजय शिंदे | 195 |
| 38 | भारतातील ग्रामीण व आदिवासी महिला विकास व समाजकार्य हस्तक्षेप | प्रा.वसंत राठोड | 203 |
| 39 | आधुनिक भारताच्या उभारणीत संविधानाचे योगदान | डॉ जाधव.एस.व्ही. | 207 |
| 40 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार | डॉ.लता आंदे | 212 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यसमाजवादासंबंधी विचार | डॉ.पद्माकर दारोंडे | 216 |
| 42 | मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व | डॉ.मीनाक्षी देव | 220 |
| 43 | आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य संपादन पातळीचा तुलनात्मक अभ्यास | आशिष वसावे, डॉ.संजय शिंदे | 223 |
| 44 | जोड अध्ययन (Blended Leaming) : काळाची गरज | डॉ. सौ. विजया वाविस्कर | 228 |
| 45 | विधानसभा निवडणुकीतील अभिजनवादी चौकट (सोलापूर विधानसभा निवडणूक - ऑक्टोबर - २०१९) | डॉ. राजकुमार सुरवसे | 233 |
| 46 | ग्रामीण भागातील खेळाडूंच्या जीवनात पोषण आहाराचे महत्त्व | डॉ.नाजुकराव बनकर | 239 |
| 47 | आरोग्यवर्धक रानभाज्या | डॉ. अंजली मस्करेन्हस | 242 |


TRUE COPY

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS & COMMERCE COLLEGE
Tal-Khatav

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 258 (B),
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
January 2021

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार

प्रा.डॉ.लता दिगंबर आदे
शंकरराव जगताप आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली,
ता.कोरेगाव, जि.सातारा, ४१५५२५
मो.नं.९४२०८०८९६१
andclata67@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे कैवारी, प्रसिध्द कायदेपंडित, समाजसुधारक, अस्पृश्योध्दारक, स्त्री–मुक्तीचे पुरस्कर्ते, प्रसिध्द विचारवंत, ज्ञानमहर्षी आणि राज्यघटनेचे शिल्पकार अशा विविध दृष्टीकोनातून ख्यातनाम असले तरी 'थोर अर्थशास्त्रज्ञ' हा त्यांच्या व्यक्तीमत्वाचा महान पैलू होता हे विसरता येत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर १५जून १९१३ ते १४ जून १९१६ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी शिष्यवृत्ती घेऊन भीमराव आंबेडकर एस.एस.अॅंकोना या बोटीने प्रवास करून दि.२० जुलै १९१३ रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात येउन पोहचले. डॉ. आंबेडकरांनी एम.ए.साठी अॅडमिनिस्ट्रेशन अॅण्ड फायनॅन्स ऑफ दि इस्ट इंडिया कंपनी' हा प्रबंध सादर केला. यानंतर पीएच.डी. पदवी साठी ''नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया ए हिस्टॉरिकल अॅण्ड अॅनॉलिटिकल स्टडी' हा विषय घेतला. डॉ. आंबेडकरांनी एका वर्षात १८–१८ तास अभ्यास करून सन १९१६ मध्ये प्रबंध सादर केला.[1] अशा प्रकारे केवळ तीन वर्षात दोन पदव्या मिळविणारे कोलंबिया विद्यापीठातील भीमराव आंबेडकर हे पहिलेच विद्यार्थी आहेत. जगातील २०० हुशार विद्यार्थ्यांच्या यादीत पहिले नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने ''कॉन्स्टिट्यूशनल लॉ''या विषयासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासन'' केंद्र स्थापन केले आहे.[2]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्र या विषयाचा सखोल अभ्यास होता. अर्थशास्त्राशी संबंधित असणा–या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार सदर शोध निबंधात सविस्तर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार:

TRUE COPY

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार त्यांच्या १९१८ मध्ये प्रसिध्द झालेल्या Small Holdings in india and their Remedies' म्हणजेच भारतातील अल्प भूधारणा आणि त्यावरील उपाय आणि १९४७ मध्ये झालेल्या त्यांच्या States and Minorities' म्हणजेच 'सरकार आणि अल्पसंख्याक'या ग्रंथात मांडलेल्या स्वातंत्र्योत्तर भारतासाठी विकास नीतिविषयक विचारामध्ये दिसून येते.[3]शेती विकासाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेबांनी दारिद्र निर्मूलन,सामाजिक व आर्थिक विषमतेचे निर्मूलन, गरीब व दलितांच्या पिळवणूकीचे निर्मूलन कसे करता येईल यावर जास्त भर दिला. डॉ. बाबासाहेबांनी सतत अन्यायविरूध्द संघर्ष केला.लहान शेतक–यांचे प्रश्न, भूमिहीन, शेतमजूर,जमीन धारणा,शेती पध्दती,इत्यादी प्रश्नावर विचार मांडले. जमीन दारी,खोत पध्दती,महार वतन,शेत महसुल इत्यादी च्या निर्मूलनासाठी संघर्ष केला.

### १.अल्प भूधारणा किंवा जमीन धारणा:

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्यपूर्वकालीन भारतातील अल्प भूधारणा किंवा जमीन धारणा समस्येचे विश्लेषण करण्यापूर्वी आपल्या अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व काय आहे ते स्पष्ट करतात. भारतीय अर्थवयवस्थेतील प्राथमिक उद्योगाच्या विकासासाठी शेतीचा विकास अत्यंत महत्वाचा आहे. शेती विकासाशिवाय

SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE WAGHOLI

प्राथमिक उद्योगाचाविकास होणे शक्यच नाही असे आंबेडकरांचे मत होते. प्राथमिक उद्योग अत्यंत महत्वाचे असतात.कारण त्यातून लोकांचा उदरनिर्वाह , उद्योगासाठी कच्चा माल उपलब्ध होणे शक्य होते. तसेच इतर उद्योगाचा विकासही त्यावर अवलंबून असतो. माणूस अन्नाशिवाय जिवंत राहू शकत नाही. तसेच त्याची कार्यक्षमता व त्यासाठी आवश्यक उर्जा अन्नातूनच उर्जा त्याला मिळते. शेती हेच अन्न पुरवठा करण्याचे साधन आहे. वरील सर्व कारणांचा परिणाम म्हणून शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्वाचे स्थान आहे. [४]

२.शेतजमीन धारणेचे आकारमान :

डॉ. आंबेडकरांच्या मते, त्याकाळातील भारतातील शेतजमीन धारणेचे आकारमान अल्प होते. १८९६–९७ मध्ये मुंबई प्रांतात २४.०७ एकर वरून २३.०९ एकर पर्यंत घटले. मध्यवर्ती प्रांतात ते १७ एकर वरून ४८ पर्यंत वाढल्याचा अपवादही आढळतो.मद्रास प्रांतात शेतजमीनीचे सरासरी आकारमान ७ एकर एवढे स्थिर राहिल्याचे दिसते.बडोदा राज्यात एकूण ४२,४९,५१७ बीगा (८ बीगा =५ एकर म्हणजेच १ बीगा =०.६ एकर) जमीन होती.तिचे १२,९२,६७१ सर्व्हे नंबरमध्ये विभाजन झाले होते. एकूण ३,२८,६४९ खातेदार होते आणि प्रत्येक खातेदाराला सरासरी ३.५एकर जमीन वाट्यास आली होती.त्यानंतर डॉ. आंबेडकर या समस्येचे विश्लेषण करण्यासाठी पुण्याजवळील पिंपळा गावातील शेतजमीन कशी अल्प आहे त्याची आकडेवारी देतात. त्यांच्या मते, पिंपळा गावात २ ते३ एकर जमीन धारणा केलेली ६७ शेतकरी कुटुंबे होती. १ ते २ एकर जमीन असलेली १६४ कुटुंबे होती. ३० ते ४० गुंठे जमीन असणारी ७५ शेतकरी कुटुंबे होती.तर २० ते३० गुंठे जमीन असणारी १३६ शेतकरी कुटुंबे होती.यावरून भारतातील शेतजमीनीचे आकारमान किती अल्प आहे ते स्पष्ट सहज होते.त्याचबरोबर ही शेतजमीन विखुरलेली होती. हेही डॉ.आंबेडकरांनी भारतातीलदरडोई शेतजमीन प्रांत,राज्य आणि गावपातळीवरील आकडेवारीच्या साहायाने स्पष्ट केले आहे. याचबरोबर देशातील पशुधन,नांगर व बैलगाडया याची संख्याही वेगाने कमी होत असल्याचे डॉ. आंबेडकर नमूद करतात. त्यांच्या मते, भारतातील दरडोई शेतजमीन उपलब्धता फक्त १ एकर होती. मात्र त्याच वेळेला ती रशियात ५.६० एकर आणि अमेरिकेत ८.९० एकर उपलब्धता १८९५ मध्ये असल्याचे सांगतात.

३.शेतीची उत्पादकता :

भारतातील शेत जमीन अल्प राहण्याबरोबरच शेतीशी संबंधित इतरही काही महत्वाच्या समस्या आहेत असे डॉ.आंबेडकरानी सांगितले आहे.या समस्या प्रामुख्याने देशातील श्शेतजमीनीच्या अल्प आकारमानातून निर्माण झालेल्या आहेत. देशातील इतर उत्पादक क्षेत्राचा विकास अपेक्षित प्रमाणात न झाल्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेतीवर अवलंबून राहणा–या लोकांचे प्रमाण जास्त आहे. इंग्लंडमध्ये ते प्रमाण फक्त १५.३ टक्के,अमेरिकेत ३३.३ टक्के,आयर्लंडमध्ये ४४.७ टक्के एवढे अल्प होते.भारतात मात्र ते ७१.५ टक्के एवढे सर्वाधिक आणि अतिरिक्त होते.याचबरोबर भारतातील शेतीची उत्पादकताही अत्यल्प आहे.१,८७३ मध्ये इंग्लंडमध्ये शेतीची दर एकरी उत्पादकता १,०५४ किलो गहू आणि ३,४८७ किलो मका एवढी होती. ती कॅनडामध्ये १,७२३ किलो गहू आणि ३,९९१ किलो मका एवढी सर्वाधिक होती.मात्र त्याचवेळेला भारतात उत्तर प्रदेशात ८५० किलो गहू आणि १,१०० किलो मका ,पंजाबमध्ये ५५५ किलो गहू आणि ७६६ किलो मका एवढी अल्प होती. [५]

४.भारतीय शेतीच्या समस्या :

डॉ. आंबेडकर हे कृतीशील अर्थशास्त्रज्ञ होते. भारतीय शेतीसमारील समस्या सांगतात, त्या अशा अल्प शेतजमीन धारणा, तुकडीकरण आणि विखुरीकरण या समस्येवर उपायही सुचवितात.ते जमीनीचे एकत्रीकरण

फक्त तुकडेजोड अपेक्षित नाही,तर ते आकारमान आर्थिक आकारमानही असणे आवश्यक आहे. हे जमिनीचे आर्थिक आकारमान फक्त शेतजमिनीच्या आकारमानावर अवलंबून नसते. तर ते भांडवल आणि भांडवली वस्तू या उत्पादन घटकांच्या प्रमाणावरही अवलंबून असते. असे मत डॉ.आंबेडकरांनी मांडले. अल्प शेत जमीन धारणेची समस्या सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी इतरही महत्वाचे उपाय सुचविले आहेत यात श्रमशक्ती किंवा शेतमजूर शेतीकडून बिगरशेती उत्पादन व रोजगाराकडे वळविणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरण भारतातील शेती समस्यांवरील अत्यंत महत्वाचे आणि खात्रीशीर मार्ग आहे.असे आंबेडकर सांगतात. [5]औद्योगिकीकरण ही नैसर्गिक आणि प्रभावी उपाययोजना असून ती अमेरिकेत सिध्दही झाली आहे. दारिद्र्य निर्मूलनावरील हा महत्वाचा उपाय आहे. याशिवाय शेतजमिनीचे तुकडे एकत्र करण्याबरोबरच विभाजन आणि तुकडीकरण रोखण्यासही उपयुक्त आहे. क्षेत्रविकासात वस्तूनिर्माण क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य द्यावे. त्यातूनच भारतीय शेतीसमोरील समस्या सोडविण्याबरोबरच अतिरिक्त फुगत जाणारी लोकसंख्या नियंत्रित होऊन त्याची नागरीकरणासही मदत होईल.

५.शेतीला उद्योगाचा दर्जा

शेती उद्योग सरकारचा उद्योग असणे आवश्यक आहे. म्हणजेच शेतीला सार्वजनिक उद्योगाचा दर्जा प्राप्त करून देणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सरकार शेतीचे खासगी मालकी हक्क स्वतःकडे घेईल. [6]अर्थात खासगी शेती मालकाला ऋणपत्रे स्वरूपात नुकसान भरपाईचा अधिकार प्राप्त होईल. ऋणपत्रे स्थलांतरणीय असून त्याचे वारिसाने एका पिढीकडून दुस–या पिढीकडे स्थलांतरण होऊ शकेल. ऋणपत्रावर व्याज स्वरूपात मोबदला मिळेल. असे मत डॉ. आंबेडकराचे होते.

६.सामुदायिक शेती :

शेतीच्या विकासासाठी शेती कसण्याच्या पध्दती म्हणजेच मालकीत बदल होणे आवश्यक आहे. शेतीजमीनीची मालकी खासगी ऐवजी सामुदायिक असणे आवश्यक आहे.त्यासाठी शेतीच्या प्रमाणित आकारमानात विभाजन करावे.ती कसण्यासाठी कुळांना द्यावी.शेती कसण्याचे नियम आणि नियमने सरकारने तयार करावीत.शेतीतून मिळणा–या एकूण उत्पन्नातून काही महत्वाचे हिस्से वजा केल्यानंतर राहिलेले उत्पादन कुळाला देण्यात यावे.शेती कुळांना कसण्यासाठी देतांना जात,वंश किंवा इतर कोणताही भेद न करता द्यावी. शेती सरकारच्या मालकीची होत असल्याने सरकारनेजलसिंचन,शेती उपयुक्त अवजारे, पशुधन, बी–बियाणे,खते इत्यादी आवश्यक बाबीसाठी आवश्यक वित्त पुरवठाही करावा. त्यानंतर शेतीतून निर्माण होणा–या उत्पादनाचे वाटप विविध घटकांमध्ये हिस्स्यांच्या स्वरूपात कसे करावे ते स्पष्ट करतात. असे मत डॉ.आंबेडकरांनी मांडले. [7]यांच्या मते एकूण शेती उत्पादनातून शेतसारा, ऋणपत्रे धारकांना व्याज, भांडवली वस्तूंच्या वापराचा मोबदला, जी कुळे सामुदायिक शेतीचे नियम मोडतील किंवा दुर्लक्ष करतील त्यांना दंड अशा प्रकारचे अनेक हिस्से एकूण उत्पादनातून वजा केल्यास शिल्लक राहणारे सर्व उत्पादन कुळाला देण्यात यावे. असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

७.खोती–पध्दती निर्मूलन विधेयक १७ सप्टेंबर १९३७ :

१९३५ च्या कायद्यानुसार इ.स. १९३७मध्ये प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका लागल्या. मुंबई प्रांताच्या विधि मंडळ निवडणूकीसाठी डॉ.बाबासाहेबांचा 'स्वतंत्र मजूर पक्ष' मैदानात उतरला. १७ पैकी १४ जागेवर विजयी झाले. पक्ष नेते म्हणून विधानसभेत डॉ. बाबासाहेबांनी भूमिहिन शेतकरी, मजूर व कामगारांच्या समस्या मांडल्या.१.खोती अंताचे विधेयक २.संतती नियमन विधेयक ३.महार वतने नष्ट करण्याबाबतचे विधेयक

TRUE COPY

४.सावकारी कर्ज देण्याविषयीचे विधेयक अशी चार विधेयक मांडण्यात आली. त्यापैकी खोती अंताविषयीचे विधेयक डॉ.बाबासाहेबांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधीमंडळात मांडले. खोताना नुकसान भरपाई मिळावी अशी तरतूदही त्यांनी विधेयकात केली. [९]

**समारोप :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थतज्ञ होते. दलित, वंचित व अस्पृश्य समाजातील लोकांच्या उध्दारासाठी आयुष्यभर लढले. ते समाजसेवक होते. दलित बांधवांना त्यांनी मानवी हक्क मिळवून दिला. या समाजातील लोकांचे सामाजिक, राजकीय व आर्थिक असे अनेक प्रश्न सोडविले. त्यांनी शेतीविषयक विचार मांडले. ते कृतीशील अर्थतज्ञ होते. त्यांनी शेतीविषयक विचार मांडताना लोकांकडे किती जमीन आहे याचे सर्वेक्षण केले. आपल्या भारतातील शेती उत्पादन आणि परदेशातील शेती उत्पादन याचा अभ्यास केला तर त्यात फार मोठी तफावत दिसून आली. किमान जमीन धारणा, जमीन महसूल पध्दत, सामूहिक शेती पध्दत, महार वतन व खोती पध्दत इत्यादी प्रश्न सोडविले. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकारने लक्ष द्यावे. सरकार तर्फे गरीब शेतकऱ्यांना कर्ज द्यावे, बी–बीयाणे, अवजारे, पशुधन, खते इत्यादीचा पुरवठा सरकारने करावा. अर्थशास्त्र या विषयाचे किती सखोल ज्ञान होते, हे त्यांच्या शेतीविषयक विचारावरून स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. प्रा.डॉ.अनिल सिंगारे 'महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास' अरूणा प्रकाशन लातूर,जुलै २०१२,पृ.३२
2. लोकसत्तादि.३ एप्रिल २०१०,पृ.५
3. प्रा.डॉ.पी.एस.कांबळे, डॉ.बी.आर.आंबेडकर एक अर्थतज्ञ' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती गौरवग्रंथ,एप्रिल २०१६ पृ.६४
4. Ambedkar B.A.,Small Holding in india and their Remedies,in Writing and Speeches of Dr.Ambedkar, Vol-no.1,Government of Maharashtra,Mumbai ,1918 ,page no-456
5. ibid page no-458
6. ibid page no-475
7. Ambedkar B.A.,States and minorities , in Writing and Speeches of Dr.Ambedkar, Vol-no.1,Government of Maharashtra,Mumbai,1947 page no-396
8. ibid page no. 395,396
9. प्राचार्य काळे बी.सी., अर्थशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर,मनोकामना प्रकाशन,इस्लामपूर, मे –२०१२